## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७८४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/११/२०१६

**१) शेतातील धानाचे पोत्याची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २९/११/२०१६ रोजी ०१.०० वा. यातील फिर्यादी जगदीश नामदेव ईश्वरकर वय ५५ वर्ष, रा. कोथुर्णा हा मुलगा अंकुश ईश्वरकर याचे सोबत शेतात पाणी देण्याकरीता गेला असता त्याचे शेतात ठेवलेले धाणाचे २५ पोते त्या पैकी एक धाणाचा पोता रोड जवळ दिसुन आला कोणीतरी धाणाची चोरी करुन नेत आहे म्हणुन आजुबाजुला पाहीले तर रोडवर एक बोलेरो मॅक्स क्र. एमएच ३५ के २२२० गाडी उभी होती व धान पोते ठेवलेल्या जागी तिन ते चार इसम उभे होते ते फिर्यादीला पाहुन पळुन गेले त्यांचा पाठलाग करुन धान चोर इसम क्र. १ प्रभाकर मोतीराम धोटे रा. पांजरा हा वाहनासह धाणाचे गाडीत मिळुन आल्याने फिर्यादीचे तोडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९,५११,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. श्रीरामे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) शिविगाळ करु नका याकारणावरुन बंडीची उभारी डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . : —**

दिनांक २८/११/२०१६ चे १९.३० वा. दर. यातील आरोपी आपल्या तिन मित्रा सह जखमी फिर्यादीचे माहालपे भावाचे दुकाना समोर अश्लिल शब्दात बोलत असतांना फिर्यादीने इथे शिविगाळ करु नका असे आरोपीस हटकल्याने अंगणात ठेवलेल्या बंडीची उभारी आणुन फिर्यादीचे डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी गुलाब हिरामन उदलकर वय ५० वर्ष, रा. डोंगरी/बुज याचे बयान वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पो.स्टे गोबरवाही हे करीत आहेत.

**३) सोंडा सिटी गाडी चालकाच्या निष्काळजीपणामुळे, एक जखमी . : —**

दिनांक २८/११/२०१६ चे २३.०० वा. दर. यातील फिर्यादी उमेश उद्धव बांन्ते वय ४० वर्ष, रा. लाखोरी हा आपल्या ओमनी व्हन क्र. एमएच ३१/डीआर ३८९१ नी भोजापुर गावावरुन एनएच ६ रोडने लाखोरी कडे जात असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील होंडा सिटी गाडी भरधाव वेगाने व निष्काळजीपणे हयगयीने चालवुन फिर्यादीचे गाडीला समोरुन जिल्हाधिकारी कार्यालय समोर भंडारा येथे धडक देवुन गाडीत बसलेली फिर्यादीची पत्नी सौ. सरीता बांन्ते वय ३२ वर्ष, हिला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पो. स्टे भंडारा हे करीत आहेत.

**४) अवैध दारु अडयांवर धाडी . :—**

दिनांक २९/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, जवाहरनगर व पालांदुर येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४५ लिटर हातभट्टी दारू कि. ३,२५०/—रू. व ३ लिटर ६०० मिली लिटर देशी दारू कि. १,०००/—रू असा एकुण कि. ४,२५०/ —रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.